MHPU240013742021

**फौ.कि.अर्ज क्र. २५१/२०२१ मधील निशाणी क्र. १८ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ हा काम करत असलेल्या कंपनीला त्याचे सप्टेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीचे पगारपत्रक न्यायालयात दाखल करण्यासाठी कंपनीला आदेश होवून मिळावा म्हणून दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे कथनानुसार, जाबदेणार क्र. १ याने त्याचे मालमत्ता व जबाबदारीचे खोटे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल करुन उत्पन्नाबाबत खोटी व चुकीची माहिती दिली आहे. जाबदेणार क्र. १ हा 'महाले होल्डिंग प्रा.लि., एक इल्प्रो पार्क, सीटीएस नं. ४२७०, इल्प्रो कंपाउंड, चिंचवड, ४११ ०३३' या कंपनीत नोकरी करत आहे. सदर कंपनीकडे अर्जदार हिने जाबदेणार हे सदर कंपनीत काम करत असल्याची माहिती मिळविलेली आहे. परंतु जाबदेणार यांचे उत्पन्नाबाबत माहिती मिळण्याकरीता न्यायालयाचा लेखी आदेश असेल तरच सदर माहिती देता येईल असे कपंनीचे पदाधिकारी यांनी ईमेलद्वारे कळविले आहे. त्यामुळे जाबदेणाराच्या उत्पन्नाबाबतची माहिती कंपनीकडून मिळणे न्यायचे दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. याशिवाय दुसरा पर्याय अर्जदारास उपलब्ध नाही. सबब, अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

३. याउलट, जाबदेणार क्र. १ याने निशाणी क्र. २२ वर त्याचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली. जाबदेणार क्र. १ याच्या म्हणण्यानुसार, अर्जदाराचा अर्ज हा खोटा, चुकीचा व बेकायदेशीर आहे. जाबदेणार क्र. १ याने त्याचे मालमत्ता व जबाबदारीचे दिलेले प्रतिज्ञापत्र हे खरे

व बरोबर आहे. अर्जदार व जाबदेणार यांनी यापुर्वीच मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदारास जाबदेणाराच्या नोकरी व उत्पन्नाची माहिती कंपनीकडून मागविण्याची प्रक्रिया बेकायदेशीर असून ती अर्जदारास मागविता येणार नाही.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार हिने मुळ अर्ज हा कलम १२ प्रमाणे कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण अधिनियम २००५ अन्वये दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये अर्जदार हिने तिला अंतरिम पोटगी मिळावी म्हणून देखील अर्ज दाखल केलेला आहे. जाबदेणार यांनी सदर प्रकरणामध्ये त्यांचे लेखी म्हणणे व अंतरिम पोटगीच्या अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. अभिलेखावर दाखल असलेले अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, अर्जदार व जाबदेणार क्र. हे दोघेही माहिती तंत्रज्ञान अभियंता असल्याचे दिसून येतात. तसेच जाबदेणार क्र. १ याने त्याचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रामध्ये तो अभियंता म्हणून नोकरीस असल्याचे व त्याला रक्कम रुपये २९,०००/— पगार मिळत असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच जाबदेणार याने अर्जदाराने दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करतांना तो सदर कंपनीत काम करत असल्याचे नाकारलेले नाही. शिवाय सदरच्या प्रकरणामध्ये अंतरिम पोटगी अर्जावर आदेश होणे बाकी असून सद्य परिस्थितीत अर्जदाराने प्रथमदर्शनी पुरावा दाखल करणे आवश्यक असते. तसेच अर्जदाराच्या अर्जातील कथने शाबीत करण्याची संपुर्ण जबाबदारी ही अर्जदाराची असते. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजुर केल्यास अर्जदार तिच्या अर्जातील कथने शाबीत करण्यासाठी न्यायालयामार्फत पुरावा गोळा करत आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. एकंदरीत सदर प्रकरणातील अर्जदार व जाबदेणार यांचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र, तसेच प्रकरणातील सद्य परिस्थितीचा विचार करता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

अर्जदाराचा अर्ज निशाणी क्र. १८ खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by MEGHA SHANKARRAO MALI
Date: 2023.08.17 18:33:57 +0530

घोडेगाव ( एम. एस. माळी )
दिनांक १७/०८/२०२३ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगांव, जि. पुणे.